आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि.१४ / ०२ /2025

## (गोषवारा)

प्रकरण क्र.४३८:- मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत "चालक-यंत्रचालक" या पदावर सेवा कायम समावेशन होण्याबाबत...

श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक, अग्निशमन विभाग यांनी त्यांचे वडिल मनोविकाराने ग्रस्त असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सेवा कायम समावेशन होण्याबाबत दि.19/01/2024 अन्वये विनंती अर्ज केलेला आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन सेवेतील वर्ग-3 "चालक-यंत्रचालक" पदाची खुल्या प्रवर्गातील रिक्त पदाची माहिती मिळणेबाबत दि.29/07/2024 च्या पत्रान्वये कळविले होते. तद्नंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून श्री.जयेश पंडित राऊत यांचे सेवाविषयक बाबींची माहिती मिळणेकरीता दि.06/08/2024 च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच सेवा कायम समावेशन करणेकरीता दि.15 मे 2019 रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत संमतीपत्र सादर करणेबाबत कळविलेनुसार संबंधित कर्मचारी यांनी दि.23/08/2024 रोजी संमतीपत्र सादर केलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दि.06/08/2024 रोजीच्या पत्रान्वये श्री.जयेश पंडित राऊत यांच्या सेवाविषय माहिती व संमतीपत्र सादर करणेबाबत कळविल्यानुसार त्याबाबत दि.05/09/2024 रोजीच्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस माहिती सादर करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कायमस्वरुपी सेवा वर्ग करणेकरीता दि.15 मे 2019 रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती नुसार कार्यमुक्तीचे आदेश निर्गमित करणेबाबत संदर्भ दि.02/01/2025 अन्वये उप-आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

श्री.जयेश पंडित राऊत यांनी दि.15 मे 2019 रोजीच्या शासन निर्णयातील "परिशिष्ट-दोन" नुसार दि.09/01/2025 अन्वये बंधपत्र इकडील विभागास सादर केलेले आहे.

सबब श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक, अग्निशमन विभाग यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कायमस्वरुपी सेवा वर्ग करणेकरीता मा.प्रशासक यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

### दि. १४ /०२ /2025

प्रकरण क्र.७३८ मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत "चालक-यंत्रचालक या पदावर सेवा कायम समावेशन होण्याबाबत...

**कार्यालयीन प्रस्ताव**

श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक, अग्निशमन विभाग यांनी वडिल मनोविकाराने ग्रस्त असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सेवा कायम समावेशन होण्याबाबत दि.19/01/2024 अन्वये विनंती अर्ज केलेला आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन सेवेतील वर्ग-3 "चालक-यंत्रचालक" पदाची खुल्या प्रवर्गातील रिक्त पदाची माहिती मिळणेबाबत दि.29/07/2024 च्या पत्रान्वये कळविले आहे. तद्नंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून श्री.जयेश पंडित राऊत यांचे सेवाविषयक बाबींची माहिती मिळणेकरीता दि.06/08/2024 च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच सेवा कायम समावेशन करणेकरीता दि.15 मे 2019 रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत संमतीपत्र सादर करणेबाबत कळविलेनुसार संबंधित कर्मचारी यांनी दि.23/08/2024 रोजी संमतीपत्र सादर केलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दि.06/08/2024 रोजीच्या पत्रान्वये श्री.जयेश पंडित राऊत यांच्या सेवाविषय माहिती व संमतीपत्र सादर करणेबाबत कळविल्यानुसार त्याबाबत दि.05/09/2024 रोजीच्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस माहिती सादर करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कायमस्वरुपी सेवा वर्ग करणेकरीता दि.15 मे 2019 रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती नुसार कार्यमुक्तीचे आदेश निर्गमित करणेबाबत संदर्भ दि.02/01/2025 अन्वये उप-आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

श्री.जयेश पंडित राऊत यांनी दि.15 मे 2019 रोजीच्या शासन निर्णयातील "परिशिष्ट-दोन" नुसार दि.09/01/2025 अन्वये बंधपत्र इकडील विभागास सादर केलेले आहे.

सबब श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक, अग्निशमन विभाग यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कायमस्वरुपी सेवा वर्ग करणे मान्यता मिळावी, असा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ४३e दिनांक १४/02 /2025

"मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चालक-यंत्रचालक या पदावर सेवा कायम समावेशन होण्याबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1, ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "श्री.जयेश पंडित राऊत, चालक-यंत्रचालक, अग्निशमन विभाग यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कायमस्वरुपी सेवा वर्ग करणे मंजूरी देण्यात येत आहे."

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // सार्वजनिक बांधकाम विभाग //

// गोषवारा //

दि. १४/०२/२०२५

**प्रकरण क्र (४४०) :- सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज आणि माझी वसुंधरा अंतर्गत "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" ९.० मुदतवाढीबाबत.**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनामार्फत सफाईमित्र सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत शासनाने नेमुन दिलेल्या सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी महानगरपालिकेतर्फ केली जात आहे.

केंद्र शासनाच्या सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अभियान अंतर्गत नविन प्रस्तावित इंटर्नशिप राबविण्यात येणार आहे. सदर प्रस्तावित योजनेचे नाव सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राममध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी उपलब्ध करणे असून त्याद्वारे सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज व माझी वसुंधरा अभियानामध्ये संशोधन, प्रचार-प्रसार आणि सफाईमित्रांच्या आयुष्यात झालेल्या बदलावर "सक्सेस स्टोरीज" तयार करणे आहे. तसेच सदर प्रोग्रामचे मुख्य ध्येय हे खालीलप्रमाणे आहे.

१. सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज व माझी वसुंधरा अभियान बद्दल महानगरपालिका क्षेत्रात प्रचार-प्रसार करणे.
२. सफाईमित्रांच्या आयुष्यात झालेल्या बदलाची 'सक्सेस स्टोरीज' तयार करणे.
३. सेप्टिक टँक, सीवर लाइन/मलनिःसारण बाबत सफाईमित्रांसह नागरिकांसोबत वर्कशॉप घेणे / माझी वसुंधरा जनजागृती अभियान राबविणे.
४. गटचर्चा आणि संघटित प्रयत्नांद्वारे सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज सादरीकरण महानगरपालिकेच्या प्रत्येक वॉर्डमध्ये करणे.
५. माणूस आणि पर्यावरण यांचे अतूट नाते / माणसाला या नात्यांचा विसर / या नात्यांची जाणीव होण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.
६. वसुंधरा दिन / जल दिवस पाळण्याची सुरुवात आणि शपथपत्र घेण्यासाठी नागरीकांना प्रोत्साहीत करणे / सहभागी करणे.
७. कचरा व्यवस्थापन, वाहनांची योग्य ती देखभाल, सौरऊर्जा, संसाधनांचा मर्यादित वापर वगैरे मार्गानी उपाय योजना सुरु करण्यासाठी संशोधन करुन नाविण्यपूर्ण संकल्पना सुचवणे.

उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेस शिफारस आहे.

मा. आयुक्त सो. व मा. शहर अभियंता यांच्यासोबत झालेला चर्चेनुसार आणि दिलेल्या सूचनेनूसार 'सफाईमित्र इंटर्नशीप प्रोग्राम ९.०' मध्ये खालीलप्रमाणे पध्दती प्रस्तावित केले जात आहे.

**निवड समिती**

मा. अतिरिक्त आयुक्त-१ यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती प्रस्तावित केली जात आहे.

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त आयुक्त - १ | अध्यक्ष |
| २ | उप- आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) | सदस्य |
| ३ | उप- आयुक्त (पर्यावरण) | सदस्य |
| ४ | उप- आयुक्त (उद्यान) | सदस्य |
| ५ | शहर अभियंता | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम/ विद्युत | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७ | कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा/ मलनि:सारण | सदस्य सचिव |

**समितीचे कामाचे स्वरुप**

१. इंटर्नसाठी आलेल्या अर्जाची छाननी करणे

२. अर्जदारांच्या मुलाखती घेणे

३. मुलाखतीद्वारे पात्र झालेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे

४. इंटर्न्स अर्ज करणेसाठी जाहिर आवाहन / परिपत्रक प्रसिध्द करणे.

५. मुलाखतीचा नमुना / प्रश्नावली तयार करणे.

६. मुल्यांकन पध्दत निश्चित करणे.

तरी सदरील इंटर्नशिप प्रोग्राममुळे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम / संकल्पनांमध्ये सहभाग असतो. तसेच केंद्र सरकार / राज्य शासनाच्या जवळपास १५अभियानांमध्ये देखील विविध उपक्रमांमध्ये इंटर्न्स काम करतात. आतापर्यंत ८.० बॅच यशस्वीरित्या पूर्ण झालेल्या असून युवकांच्या कल्पकेचा नाविन्यपूर्ण बाबींचा उपयोग विविध संकल्पनांमध्ये व्हावा या हेतूने "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम" काम करते.

महानगरपालिकेचा हा नाविन्यपूर्ण उपक्रमाचे केंद्र आणि राज्य शासनाने देखील वेळोवेळी प्रशंसा केलेली आहे. तरी सदरील उपक्रमास मुदतवाढ मिळावी यासाठी शिफारस आहे. मान्यतेसाठी सविनय सादर.

**इंटर्नशिपचा कालावधी :-**

"सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP) चा कालावधी **दिनांक ०१ मार्च २०२५** ते **३० ऑगस्ट २०२५** रोजी मुदत संपणार आहे."सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" या कार्यक्रमामध्ये प्रस्तावित इंटर्न्सची आवश्यकता असून त्यानुसार त्यांना जबाबदाऱ्या दिल्या जातील.

| **"सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)** | | |
|---|---|---|
| **प्रस्तावित इंटर्न** | **प्रस्तावित इंटर्नची एकूण संख्या** | **अभियान** |
| इंटर्न | २५ | सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज, माझी वसुंधरा अभियान, पेय जल सर्वेक्षण, जल शक्ति अभियान |
| **एकूण** | **२५** | |

वरीलप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेले सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज २०२४-२५ मध्ये प्रचार- प्रसार करण्यासाठी "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम आयोजित करण्याचा मानस आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव देणं आणि त्यांच्या कल्पक बुद्धीचा उपयोग महानगरपालिका क्षेत्रात करण्यासोबतच विद्यार्थ्यांचाही भविष्याच्या दृष्टीने त्यांचं विकास वृद्धिंगत व्हावा हा देखील कार्यक्रम प्रस्तावित करण्याचा उद्देश आहे. इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर सर्व इंटर्न्स यांना महानगरपालिकेद्वारे प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देण्यात येईल जे त्यांच्या करियरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असेल.

**कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम मध्ये इंटर्नला वॉर्डामध्ये गटवार विभागले जाईल आणि त्यानुसार त्यांना सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज संबंधीत विषय दिले जातील.

१. लोकांमध्ये परिवर्तनाचा दुवा म्हणून काम करणे.

२. सर्वेक्षण करण्यासाठी सहकार्य करणे.

३. यशस्वी स्टोरीज तयार करणे.

४. गटचर्चा आणि संवाद घडवून आणणे.

५. विभागाद्वारे वेळोवेळी सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज संबंधी सोपवलेले कार्य करणे.
६. सेप्टिक टँक/ सिवर लाईन/ मॅनहोल मध्ये काम करताना घ्यावयाची काळजी, या कामाचे आधुनिकरण आणि यावर अवलंबून असलेले विविध उद्यमीकरणाचे पर्याय आणि त्याद्वारे सफाईमित्रांनी एकत्रित येऊन "सेल्फ हेल्प ग्रुप" स्थापन करण्यासाठी इंटर्न ने विविध पर्यायांचा शोध घेणे.
७. विविध विभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या कल्याणकारी योजनांना सफाईमित्रांसमोर सादरीकरण करणे.
८. व्हिडीओग्राफी, फोटोस, फिल्डवर्क, ऑनलाईन बैठका
९. सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज व माझी वसुंधरा अभियान अहवाल तयार करणे.
१०. वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल तयार करणे. (महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी वाहन-उपलब्ध करुन देण्यात येतील.)

**कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये/ कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे :-**

**१. ज्ञान आणि कौशल्ये :-**

- सेप्टिक टँक/सीवर लाईन उद्यमीकरणाच्या संधी निर्माण करण्यासाठी संशोधन करणे.
- शासकीय योजना आणि लाभ याबाबत संशोधन करून अहवाल तयार करणे.
- पृथ्वी, निसर्ग आणि पर्यावरणीय अभ्यास, संकल्पना

**२. मानसिक अंतर्भूत कार्य :-**

- अंतर्गत स्पष्टता शोधणे
- स्वत: ला सक्षम
- व्यक्तिमत्व विकास
- पर्यावरणीय ऱ्हास आणि मानव

**३. निर्मिती :-**

- अंमलबजावणी सुरु करणे
- महानगरपालिका क्षेत्रातील समस्या, अनुभव यातून शिकून नव निर्मिती करणे
- आव्हाने, समस्या, प्रश्न समजून घेणे

**४. आपले मिरा भाईंदर भेट :-**

सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज आणि माझी वसुंधरा अभियान बाबतीत मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये भेटी देणे. या योजनेस खालील गोष्टींची आवश्यकता असणार आहे.

१. संबंधित विभागाला निर्देशित करणे. (शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, आपत्ती, नियोजन, जाहिरात, संगणक, वाचनालय, जनसंपर्क, बांधकाम, परीवहन, महिला व बालकल्याण)
२. इंटर्नसना बसण्याची व्यवस्था करण्यासाठी मुख्यालयात एक हॉल / **War Room** उपलब्ध करण्यासाठी बांधकाम विभागास निर्देशित करणे त्यासोबतच त्यांना बसणेकरीता टेबल व खुर्ची ची व्यवस्था करणे.
३. इंटर्नशिप प्रमाणपत्र आणि मोमेंटो देणे (सन्मान कार्यक्रम आयोजित करणे.)
४. सर्व इंटर्नसना ओळखपत्र (भांडार विभागास सर्व इंटर्नसना रिबीनसह आयकार्ड उपलब्ध करण्यास निर्देशित करणे)
५. सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम बद्दल जनजागृती करण्यासाठी सोशल मीडिया, वृत्तपत्रामध्ये आणि महानगरपालिकेच्या पोर्टल वर इंटर्नशिप बद्दल माहिती देणे.
६. गुगल फॉर्म्सद्वारे सर्व माध्यमांवर इंटर्नशिपचा अर्ज भरणेसाठी आवाहन करणे.
७. आलेल्या अर्जातून छानणी करून अंतिम उमेद्वार इंटर्न्स म्हणून नेमणेसाठी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग यांच्या उपस्थितीमध्ये मुलाखती घेऊन अंतिम यादी / उमेद्वार निवडणेसाठी शिफारस आहे.

मा. आयुक्त सो. यांच्या निर्देशानुसार इंटर्नस (एकूण २५) यांना प्रत्येकी रु.४,०००/- महिन्याला मानधन देण्याच्या सुचना दिलेल्या आहेत, तरी सबब २५ इंटर्न्स यांना प्रति महिन्याकरीता रु.४,०००/- प्रमाणे २५ X ४,००० = १,००,०००/- असे ५ महिन्यांचा एकुण रु.५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" या योजनेला प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेकरीता या योजनेला मुदतवाढ मिळणेबाबत शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 13/02/2024 / 11=10 वा.
रजिस्टरचे अ.क्र. ४४६ /2024/28
13/2/24
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

**प्रशासकीय ठराव दि. १४/०२/२०२५**

**प्रकरण क्र. (४४०)** :- **सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज आणि माझी वसुंधरा अंतर्गत "इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" ९.० मुदतवाढीबाबत.**

**ठराव क्र. (४४०)**

## कार्यलयीन प्रस्तावना

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनामार्फत सफाईमित्र सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत शासनाने नेमुन दिलेल्या सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी महानगरपालिकेतर्फ केली जात आहे.

केंद्र शासनाच्या सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अभियान अंतर्गत नविन प्रस्तावित इंटर्नशिप राबविण्यात येणार आहे. सदर प्रस्तावित योजनेचे नाव सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राममध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी उपलब्ध करणे असून त्याद्वारे सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज व माझी वसुंधरा अभियानामध्ये संशोधन, प्रचार-प्रसार आणि सफाईमित्रांच्या आयुष्यात झालेल्या बदलावर "सक्सेस स्टोरीज" तयार करणे आहे. तसेच सदर प्रोग्रामचे मुख्य ध्येय हे खालीलप्रमाणे आहे.

१. सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज व माझी वसुंधरा अभियान बद्दल महानगरपालिका क्षेत्रात प्रचार-प्रसार करणे.
२. सफाईमित्रांच्या आयुष्यात झालेल्या बदलाची 'सक्सेस स्टोरीज' तयार करणे.
३. सेप्टिक टँक, सीवर लाइन/मलनिःसारण बाबत सफाईमित्रांसह नागरिकांसोबत वर्कशॉप घेणे / माझी वसुंधरा जनजागृती अभियान राबविणे.
४. गटचर्चा आणि संघटित प्रयत्नांद्वारे सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज सादरीकरण महानगरपालिकेच्या प्रत्येक वॉर्डमध्ये करणे.
५. माणूस आणि पर्यावरण यांचे अतूट नाते / माणसाला या नात्यांचा विसर / या नात्यांची जाणीव होण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.
६. वसुंधरा दिन / जल दिवस पाळण्याची सुरुवात आणि शपथपत्र घेण्यासाठी नागरीकांना प्रोत्साहीत करणे / सहभागी करणे.
७. कचरा व्यवस्थापन, वाहनांची योग्य ती देखभाल, सौरऊर्जा, संसाधनांचा मर्यादित वापर वगैरे मार्गांनी उपाय योजना सुरु करण्यासाठी संशोधन करुन नाविण्यपूर्ण संकल्पना सुचवणे.

उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेस शिफारस आहे.

मा. आयुक्त सो. व मा. शहर अभियंता यांच्यासोबत झालेला चर्चेनुसार आणि दिलेल्या सूचनेनूसार 'सफाईमित्र इंटर्नशीप प्रोग्राम ९.०' मध्ये खालीलप्रमाणे पध्दती प्रस्तावित केले जात आहे.

### निवड समिती

मा. अतिरिक्त आयुक्त-१ यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती प्रस्तावित केली जात आहे.

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त आयुक्त - १ | अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| २ | उप- आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) | सदस्य |
| ३ | उप- आयुक्त (पर्यावरण) | सदस्य |
| ४ | उप- आयुक्त (उद्यान) | सदस्य |
| ५ | शहर अभियंता | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम/ विद्युत | सदस्य |
| ७ | कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा/ मलनि:सारण | सदस्य सचिव |

**<u>समितीचे कामाचे स्वरुप</u>**

१. इंटर्नसाठी आलेल्या अर्जाची छाननी करणे

२. अर्जदारांच्या मुलाखती घेणे

३. मुलाखतीद्वारे पात्र झालेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे

४. इंटर्न्स अर्ज करणेसाठी जाहिर आवाहन / परिपत्रक प्रसिध्द करणे.

५. मुलाखतीचा नमुना / प्रश्नावली तयार करणे.

६. मुल्यांकन पध्दत निश्चित करणे.

तरी सदरील इंटर्नशिप प्रोग्राममुळे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम / संकल्पनांमध्ये सहभाग असतो. तसेच केंद्र सरकार / राज्य शासनाच्या जवळपास १५अभियानांमध्ये देखील विविध उपक्रमांमध्ये इंटर्न्स काम करतात. आतापर्यंत ८.० बॅच यशस्वीरित्या पूर्ण झालेल्या असून युवकांच्या कल्पकेचा नाविन्यपूर्ण बाबींचा उपयोग विविध संकल्पनांमध्ये व्हावा या हेतूने "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम" काम करते.

महानगरपालिकेचा हा नाविन्यपूर्ण उपक्रमाचे केंद्र आणि राज्य शासनाने देखील वेळोवेळी प्रशंसा केलेली आहे. तरी सदरील उपक्रमास मुदतवाढ मिळावी यासाठी शिफारस आहे. मान्यतेसाठी सविनय सादर.

**<u>इंटर्नशिपचा कालावधी :-</u>**

"सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP) चा कालावधी **दिनांक ०१ मार्च २०२५ ते ३० ऑगस्ट २०२५** रोजी मुदत संपणार आहे."सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" या कार्यक्रमामध्ये प्रस्तावित इंटर्न्सची आवश्यकता असून त्यानुसार त्यांना जबाबदाऱ्या दिल्या जातील.

| **"सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)** | | |
|---|---|---|
| **प्रस्तावित इंटर्न** | **प्रस्तावित इंटर्नची एकूण संख्या** | **अभियान** |
| इंटर्न | २५ | सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज, माझी वसुंधरा अभियान, पेय जल सर्वेक्षण, जल शक्ति अभियान |
| **एकूण** | **२५** | |

वरीलप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेले सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज २०२४-२५ मध्ये प्रचार- प्रसार करण्यासाठी "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम आयोजित करण्याचा मानस आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव देणं आणि त्यांच्या कल्पक बुद्धीचा उपयोग महानगरपालिका क्षेत्रात करण्यासोबतच विद्यार्थ्यांचाही भविष्याच्या दृष्टीने त्यांचं विकास वृद्धिंगत व्हावा हा देखील कार्यक्रम प्रस्तावित करण्याचा उद्देश आहे. इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर सर्व इंटर्न्स यांना महानगरपालिकेद्वारे प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देण्यात येईल जे त्यांच्या करियरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असेल.

**कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम मध्ये इंटर्नला वॉर्डामध्ये गटवार विभागले जाईल आणि त्यानुसार त्यांना सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज संबंधीत विषय दिले जातील.

११. लोकांमध्ये परिवर्तनाचा दुवा म्हणून काम करणे.
१२. सर्वेक्षण करण्यासाठी सहकार्य करणे.
१३. यशस्वी स्टोरीज तयार करणे.
१४. गटचर्चा आणि संवाद घडवून आणणे.
१५. विभागाद्वारे वेळोवेळी सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज संबंधी सोपवलेले कार्य करणे.
१६. सेप्टिक टँक/ सिवर लाईन/ मॅनहोल मध्ये काम करताना घ्यावयाची काळजी, या कामाचे आधुनिकरण आणि यावर अवलंबून असलेले विविध उद्यमीकरणाचे पर्याय आणि त्याद्वारे सफाईमित्रांनी एकत्रित येऊन "सेल्फ हेल्प ग्रुप" स्थापन करण्यासाठी इंटर्न ने विविध पर्यायांचा शोध घेणे.
१७. विविध विभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या कल्याणकारी योजनांना सफाईमित्रांसमोर सादरीकरण करणे.
१८. व्हिडीओग्राफी, फोटोस, फिल्डवर्क, ऑनलाईन बैठका
१९. सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज व माझी वसुंधरा अभियान अहवाल तयार करणे.
२०. वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल तयार करणे. (महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी वाहन-उपलब्ध करुन देण्यात येतील.)

**कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये/ कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे :-**

**१. ज्ञान आणि कौशल्ये :-**

- सेप्टिक टँक/सीवर लाईन उद्यमीकरणाच्या संधी निर्माण करण्यासाठी संशोधन करणे.
- शासकीय योजना आणि लाभ याबाबत संशोधन करून अहवाल तयार करणे.
- पृथ्वी, निसर्ग आणि पर्यावरणीय अभ्यास, संकल्पना

**२. मानसिक अंतर्भूत कार्य :-**

- अंतर्गत स्पष्टता शोधणे
- स्वत: ला सक्षम
- व्यक्तिमत्व विकास
- पर्यावरणीय ऱ्हास आणि मानव

**३. निर्मिती :-**

- अंमलबजावणी सुरु करणे
- महानगरपालिका क्षेत्रातील समस्या, अनुभव यातून शिकून नव निर्मिती करणे
- आव्हाने, समस्या, प्रश्न समजून घेणे

**४. आपले मिरा भाईंदर भेट :-**

सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज आणि माझी वसुंधरा अभियान बाबतीत मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये भेटी देणे. या योजनेस खालील गोष्टींची आवश्यकता असणार आहे.

८. संबंधित विभागाला निर्देशित करणे. (शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, आपत्ती, नियोजन, जाहिरात, संगणक, वाचनालय, जनसंपर्क, बांधकाम, परीवहन, महिला व बालकल्याण)
९. इंटर्न्सना बसण्याची व्यवस्था करण्यासाठी मुख्यालयात एक हॉल / **War Room** उपलब्ध करण्यासाठी बांधकाम विभागास निर्देशित करणे त्यासोबतच त्यांना बसणेकरीता टेबल व खुर्ची ची व्यवस्था करणे.
१०. इंटर्नशिप प्रमाणपत्र आणि मोमेंटो देणे (सन्मान कार्यक्रम आयोजित करणे.)
११. सर्व इंटर्न्सना ओळखपत्र (भांडार विभागास सर्व इंटर्नसना रिबीनसह आयकार्ड उपलब्ध करण्यास निर्देशित करणे)

१२. सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम बद्दल जनजागृती करण्यासाठी सोशल मीडिया, वृत्तपत्रामध्ये आणि महानगरपालिकेच्या पोर्टल वर इंटर्नशिप बद्दल माहिती देणे.

१३. गुगल फॉर्म्सद्वारे सर्व माध्यमांवर इंटर्नशिपचा अर्ज भरणेसाठी आवाहन करणे.

१४. आलेल्या अर्जातून छानणी करून अंतिम उमेद्वार इंटर्न्स म्हणून नेमणेसाठी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग यांच्या उपस्थितीमध्ये मुलाखती घेऊन अंतिम यादी / उमेद्वार निवडणेसाठी शिफारस आहे.

मा. आयुक्त सो. यांच्या निर्देशानुसार इंटर्नस (एकूण २५) यांना प्रत्येकी रु.४,०००/- महिन्याला मानधन देण्याच्या सुचना दिलेल्या आहेत, तरी सबब २५ इंटर्न्स यांना प्रति महिन्याकरीता रु.४,०००/- प्रमाणे २५ X ४,००० = १,००,०००/- असे ५ महिन्यांचा एकुण रु.५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत "सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" या योजनेला प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेकरीता **या योजनेला मुदतवाढ मिळणेबाबत शिफारस आहे.**

**प्रशासकीय ठराव क्र. ४४० दिनांक** १४/०२/२०२४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) अन्वये मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियतील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३(ड) खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामांचे नाव | एकूण इंटर्न्स | कालावधी | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | सफाई सुरक्षा चॅलेंज माझी वसुंधरा अंतर्गत " सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम (SIP)" ९.० मुदतवाढबाबत.. | २५ | ०५ महिने | रु.५,००,०००/- |

वरील पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.वरील पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(संजय श्रीपतराव काटकर)** भाप्रसे
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**प्रत :-** पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## ग्रंथालय विभाग

### // प्रशासकीय गोषवारा //

दि. १४/०२/२०२५

**प्रकरण क्र.४१९- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथालयाकरीता व मनपा शाळा क्र. 1 ते 36 येथिल शाळांतील विदयार्थ्यांकरीता स्पर्धा परीक्षा व शासकीय कामकाजास उपयुक्त पुस्तके इत्यादीकरीता ग्रंथ खेरदी करणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरीता मनपा क्षेत्रातील ग्रंथालयाकरीता व मनपा शाळा क्र. 1 ते 36 येथिल शाळांतील विदयार्थ्यांकरीता स्पर्धा परीक्षा व शासकीय कामकाजास उपयुक्त पुस्तके इत्यादीकरीता ग्रंथ खेरदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन Online E- Tendering व्दारे तसेच वृत्तपत्र जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास आलेली होती. सदर कामी मे. अमित प्रकाशन , मे. निता बुक एजन्सी व मे. शिव बुक सेलर्स अशा 3 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारंकानी मे. निता बुक एजन्सी हे अटीशर्तीनुसार कागदपत्रे सादर केल्याने ते पात्र ठरले आहेत. प्राप्त निविदाधारकांपैकी मे. निता बुक एजन्सी यांचा दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा समिती दि. 03/12/2024 रोजीच्या बैठकीत शिफारस करण्यात आली असुन त्याकरीता पात्र असलेले निविदाधारक मे. निता बुक एजन्सी यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्याने निविदेतील दरास मा. आयुक्त सो. दि. 03/12/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस ग्रंथ खरेदी करणे कामी अंदाजित रु 20,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे. सन 2024-25 या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात पुस्तक व ग्रंथ खरेदी करीता "सार्वजनिक वाचनालय पुस्तके खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु. 20,00,000/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे. ग्रंथालय विभागाच्या शिफारशीनुसार पात्र निविदाधारक यांच्या वार्षिक दरास मंजुरी मिळणेस निविदा समितीने शिफारस केलेली आहे. संबधित ठेकेदारासोबत करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांनी दि. 08/01/2025 रोजी मंजुरी दिलेनुसार निविदाधारकांस कार्यादेश देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 79 (ड) नुसार मे. निता बुक एजन्सी यांस कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (ग्रंथालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## ग्रंथालय विभाग

**प्रशासकीय सभा दि. १४ /02 / 2025 रोजी**

**प्रकरण क्र. ४०७ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथालयाकरीता व मनपा शाळा क्र. 1 ते 36 येथिल शाळांतील विदयार्थ्यांकरीता स्पर्धा परीक्षा व शासकीय कामकाजास उपयुक्त पुस्तके इत्यादीकरीता ग्रंथ खेरदी करणे बाबत.**

**ठराव क्र. - ४०७**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरीता मनपा क्षेत्रातील ग्रंथालयाकरीता व मनपा शाळा क्र. 1 ते 36 येथिल शाळांतील विदयार्थ्यांकरीता स्पर्धा परीक्षा व शासकीय कामकाजास उपयुक्त पुस्तके इत्यादीकरीता ग्रंथ खेरदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन Online E- Tendering व्दारे तसेच वृत्तपत्र जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास आलेली होती. सदर कामी मे. अमित प्रकाशन , मे. निता बुक एजन्सी व मे. शिव बुक सेलर्स अशा 3 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारंकानी मे. निता बुक एजन्सी हे अटीशर्तीनुसार कागदपत्रे सादर केल्याने ते पात्र ठरले आहेत. प्राप्त निविदाधारकांपैकी मे. निता बुक एजन्सी यांचा दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा समिती दि. 03/12/2024 रोजीच्या बैठकीत शिफारस करण्यात आली असुन त्याकरीता पात्र असलेले निविदाधारक मे. निता बुक एजन्सी यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्याने निविदेतील दरास मा. आयुक्त सो. दि. 03/12/2025 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस ग्रंथ खरेदी करणे कामी अंदाजित रु 20,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे. सन 2024-25 या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात पुस्तक व ग्रंथ खरेदी करीता "सार्वजनिक वाचनालय पुस्तके खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु. 20,00,000/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे. ग्रंथालय विभागाच्या शिफारशीनुसार पात्र निविदाधारक यांच्या वार्षिक दरास मंजुरी मिळणेस निविदा समितीने शिफारस केलेली आहे. संबधित ठेकेदारासोबत करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांनी दि. 08/01/2025 रोजी मंजुरी दिले नुसार निविदाधारकांस कार्यादेश देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 79 (ड) नुसार मे. निता बुक एजन्सी यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास प्रशासकीय मान्यता ठरावाव्दारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार ग्रंथालय विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## दि.१४/०२ /2025

## (गोषवारा)

प्रकरण १४२ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-3 संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याकरीता पदभरती प्रक्रिया राबविणेबाबत

मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवरील गट-क संवर्गातील 340 रिक्त पदांची सरळसेवेने भरती करणेकरीता दि.25/09/2023 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने रिक्त पदांची सरळसेवेने भरती करणेकरीता दि.25/09/2023 रोजीच्या पत्रान्वये IBPS (आय.बी.पी.एस.) या कंपनीची निवड करण्यात आलेली आहे.

वर्ग-03 संवर्गातील 340 रिक्त पदे सरळसेवेने भरणेकरीता IBPS (आय.बी.पी.एस.) कंपनीचे दर, वृत्तपत्रातील जाहीरात प्रसिध्द खर्च तसेच इतर किरकोळ खर्च पाहता अंदाजित रु.9 कोटी खर्चास मा.प्रशासकीय सभा दि.03/09/2024, ठराव क्र.151 अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

वर्ग-03 संवर्गातील सरळसेवेने भतरी करण्यात येणाऱ्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (7 वा वेतन) | पदसंख्या |
|---|---|---|---|
| 1. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S-13 35400-112400 | 27 |
| 2. | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | S-13 35400-112400 | 2 |
| 3. | लिपीक टंकलेखक | S-6 19900-63200 | 13 |
| 4. | सर्व्हेअर | S-8 25500-81100 | 01 |
| 5. | प्लंबर | S-6 19900-63200 | 02 |
| 6. | फिटर | S-6 19900-63200 | 01 |
| 7. | मिस्त्री | S-6 19900-63200 | 02 |
| 8. | पंप चालक | S-6 19900-63200 | 07 |
| 9. | अनुरेखक | S-8 25500-81100 | 01 |
| 10. | विजतंत्री | S-6 19900-63200 | 01 |
| 11. | संगणक प्रोग्रामर | S-13 35400-112400 | 01 |
| 12. | स्वच्छता निरीक्षक | S-8 25500-81100 | 06 |
| 13. | चालक-यंत्रचालक | S-8 25500-81100 | 09 |
| 14. | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | S-13 35400-112400 | 03 |
| 15. | अग्निशामक | S-7 21700-69100 | 228 |
| 16. | उद्यान अधिक्षक | S-13 35400-112400 | 03 |
| 17. | लेखापाल | S-13 35400-112400 | 05 |
| 18. | डायलिसीस तंत्रज्ञ | S-13 35400-112400 | 03 |
| 19. | बालवाडी शिक्षिका | S-6 19900-63200 | 02 |
| 20. | अधिपरिचारीका | S-13 35400-112400 | 05 |
| 21. | प्रसविका | S-8 25500-81100 | 12 |
| 22. | औषध निर्माण अधिकारी | S-10 29200-92300 | 01 |
| 23. | लेखापरीक्षक | S-13 35400-112400 | 01 |

| | | | |
|---|---|---|---|
| 24. | सहायक विधी अधिकारी | S-14 38600-122800 | 02 |
| 25. | वायरमन | S-6 19900-63200 | 01 |
| 26. | ग्रंथपाल | S-13 35400-112400 | 01 |
| | एकुण | | 340 |

उपरोक्त प्रमाणे 26 संवर्गापैकी प्रथम 05 संवर्गातील पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि.12/12/2024 रोजी सदर 05 संवर्गातील पदे भरण्याकरीता IBPS (आय.बी.पी.एस.) कंपनीस जाहीरातीचा मसुदा पाठविण्यात आला.

सदर पदभरतीकरीता IBPS (आय.बी.पी.एस.) कंपनीकडून दि.16/12/2024 रोजी ई-मेलव्दारे Demo Link पाठविण्यात आली. सदर Demo Link मध्ये विभागास प्रश्न उद्भवल्यानंतर त्यांचे निराकरण करणेकरीता विभागामार्फत सतत पाठपुरावा करण्यात आला. भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला. तथापी IBPS कपंनीचे समन्वयक/अधिकारी उपलब्ध झाले नाही. त्यांचेकडून वेळेवर प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत उप-आयुक्त (मुख्यालय) यांनी तत्कालीन अतिरिक्त आयुक्त यांना IBPS कंपनीच्या मिळणाऱ्या या अल्प प्रतिसादाबाबत अवगत केले होते.

IBPS कंपनीस बैठकीस उपस्थित राहणेसाठी लेखी कळविले IBPS कंपनीने उपस्थित राहण्यासाठी नकार दिला व ऑनलाईन VC द्वारे उपस्थित राहू शकु असे भ्रमणध्वनीद्वारे कळविले. त्याअनुषंगाने श्रीम.अनघा नाईक या दि.15/01/2025 रोजी VC द्वारे उपस्थित राहील्या. तद्नंतर विभागाने त्वरीत दि.16/01/2025 रोजी IBPS कंपनीने पाठविलेल्या Demo Link बाबत अभिप्राय दिले.

पदभरती करीता येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणेकरीता IBPS कंपनीचे प्रतिनिधी यांनी समक्ष उपस्थित राहून चर्चा होणे आवश्यक होते. त्यामुळे सदर त्रूटींचे वेळेत निराकरण होणे शक्य झाले असते. सदर VC मध्ये झालेल्या चर्चेनुसार IBPS कंपनीकडून विचारणा करण्यात आलेल्या प्रश्नांचे निराकरण मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून त्वरीत करण्यात आले. तरी देखील सदर Demo Link मध्ये सुधारणा करण्याकरीता IBPS कंपनीकडून बराच अवधी घेतला गेला व त्यामुळे पदभरती प्रक्रियेस विलंब झालेला आहे. सदरबाबतीत विभागाकडून सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतू IBPS कंपनीकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

भरतीप्रक्रियेबाबत अधिक माहिती प्राप्त करणेकरीता दि.11/02/2025 रोजी मा.उपायुक्त (मुख्यालय) यांनी पनवेल महानगरपालिकेस भेट दिली. भरती प्रक्रियेबाबत पनवेल मनपा आयुक्त, उप-आयुक्त (मुख्यालय) यांचे बरोबर तसेच सदर ठिकाणी पनवेल महनगरपालिकेने भरती प्रक्रिया करणेकरीता सेवाकरार पध्दतीने नियुक्त केलेल्या श्री.विनय कुलकर्णी यांचेशी पदभरती प्रक्रियेबाबत चर्चा केली. सदर चर्चेमध्ये पनवेल महानगरपालिकेने त्यांच्या पदभरती प्रक्रियेसाठी TCS कंपनीची निवड केली असल्याचे कळले. TCS कंपनीने पदभरतीची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केलेली असून अधिकारी/कर्मचारी यांची निवड होऊन ते तेथे हजरही झालेले आहेत. सदर भेटी दरम्यान पनवेल महानगरपालिकेने TCS कंपनी सोबत केलेल्या करारनाम्यामध्ये TCS कपंनीची जबाबदारी (Scope of work) व मनपाची जबाबदारी (Scope of work) निश्चित केलेली असून त्यानुसार पध्दती अवलंबली असल्याने त्यांची भरती प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

IBPS कंपनी यांनी MOU Draft अंतीम करणेकरीता मनपास पाठविलेला आहे. सदर IBPS कपंनीच्या MOU Draft व पनवेल महानगरपालिकेने TCS कंपनी समवेत केलेला करारनामा यांची तुलना केली असता बऱ्याच बाबींमध्ये तफावत दिसून येत आहे. त्यादृष्टीने मनपाची जबाबदारी (Scope of work) व IBPS कपंनीची जबाबदारी (Scope of work) यामध्ये बदल करणे आवश्यक वाटल्याने मा.उपायुक्त (मुख्यालय) यांनी दि.11/02/2025 रोजी श्रीम.आयेशा मार्टिन यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचेकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तद्नंतर श्रीम.अनघा नाईक यांचेशी संपर्क साधून MOU मधील काही बाबींमध्ये बदल करणेकरीता त्यांना दि.12/02/2025 रोजी मनपा कार्यालयात उपस्थित राहणेबाबत विनंती केली. तथापी त्यांनी उपस्थित राहणेस नकार दिला. सबब त्यांना ऑनालाईन VC द्वारे दि.12/02/2025 रोजी उपस्थित राहणेसाठी सूचित केले

असता त्याकरीता देखील त्यांनी असमर्थता दर्शविली. यावरुन सदर कंपनीची भरती प्रक्रियेबाबत अनास्था दिसून येत आहे.

भरतीप्रक्रियेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडणेकरीता IBPS कंपनी व महानगरपालिकेमध्ये वेळोवेळी समन्वय असणे आवश्यक आहे. परंतु IBPS कंपनीकडून वेळोवेळी योग्य प्रतिसाद मिळत नाही व सदरची बाब मा.उपायुक्त (मुख्यालय) यांनी वेळोवेळी वरिष्ठांच्या निदर्शनास आणलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची पदभरती प्रक्रियेत कोणतीही त्रुटी न राहता पदभरती प्रक्रिया यशस्वी होणे आवयश्क आहे. IBPS कंपनीचा अल्प प्रतिसाद पाहता सदर पदभरती प्रक्रिया यशस्वी होणेबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

